# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट

## अंक ३१ वा

## दिनांक २९/०७/२०१९ ते दिनांक ०३/०८/२०१९

## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.

जावक क्रमांक:- 14450 दिनांक:- 09 SEP 2019

---

------

### भाग- १ :- बदली/पदोन्नती/नेमणुक :-

**बदली:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/डयुटी पोशि-कोकाटे/११५५०/१९ दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये पोशि/१७०, सुशांत गोवर्धन कोकाटे नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर यांना पुढील आदेशापर्यंत जिल्हा विशेष शाखा वाशिम येथे डयुटी करीता देण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/सपोनि/तात्पुरते अति/दैनंदिन कामकाज/११६१७/१९ दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये सहायक पोलीस निरीक्षक श्री अजयकुमार वाढवे नेम.स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचेकडे पोलीस स्टेशन सायबर येथे दैनंदिन कामकाजा करीता अतिरिक्त कामासाठी देण्यातआले आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/सपोनि/तात्पुरते अति/दैनंदिन कामकाज/११६१६/१९ दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये पोलीस निरीक्षक श्री.अवधुतराव ठाकरे नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे कडे पोलीस स्टेशन सायबर यांचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

### भाग-२ रजा :-

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/का.ना.नाईक/अर्जित रजा/११६८५/१९ दि.०३/०८/२०१९ अन्वये श्रीमती सुशिला उध्दवराव नाईक कार्यालयीन नाईक यांना त्यांचे सासुला देवाज्ञा झाल्याने त्यांना दिनांक ३०/०७/२०१९ ते दि.०९/०८/२०१९ पावेतो ११ दिवस अर्जित रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात आली आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-३/बा.सं.रजा/म.पो.कर्मचारी/११५७४/१९ दिनांक ०३/०८//१९ अन्वये मपोशि/११४३ मनिषा हिरामण राठोड नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर यांना त्यांचे विनंती नुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/से.वा.६/दिनांक २३/०७/२०१८ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना बालासंगोपन रजा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सन २०१९ या वर्षामध्ये ०२ महिन्या करीता रजेवर सोडल्याचे दिनांकापासुन मंजुर करण्यात आली आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/सलेअ अडबोल/अर्जित रजा/२०१९/११६३० दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये श्रीमती शंकुतला निळकंठराव अडबोल सहायक लेखा अधिकारी यांना त्यांचे पतीची

कडणी स्टोन शस्त्रक्रिया करण्याकरीता दिनांक ३१/०७/२०१९ ते ०८/०८/२०१९ पावेतो ०९ दिवस अर्जित रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात आली आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/अर्जित रजा/पो.अधिकारी/२०१९/११५२५ दि.३०/०७/२०१९ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंतीनुसार सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरीता अर्जित रजा मंजुर करण्यात आली आहे.

१) पोनि., बळीराम रखमाजी गिते नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर.

२) पोउपनि राजेश आत्माराम पंडीत नेमणुक पो.स्टे.शिरपुर.

३) पोउपनि/रामबाबु ग्यानबा सरोदे नेमणुक पो.स्टे.मालेगाव

४) पोउपनि, राजेन्द्र शामराव नाईक पो.स्टे.मानोरा.

५) पोउपनि, रामधन कनिराम चव्हाण वाशिम ग्रामीण.

६) पोउपनि, अमोल राजाराम जाधव मानोरा.

७) पोउपनि, विनोद जी.घुईकर नेमणुक बिडीडीएस वाशिम.

**परवानगी :-**

**भाग -३ :- बढती :- निरंक**

**पगार:-**

क्रमांक पोअवा/वेतननिश्चिती /पोहवा-११२१/राठोड/११७१६/२०१९ दिनांक ०५/०८/२०१९ अन्वये पोहवा/११२१, जि.पी.राठोड यांचे वेतननिश्चीती आदेश उचित कार्यवाही करीता वेतन लिपीक २ यांना देण्यात आले आहे.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअवा/आशा-१/सपोउपनि-करुणा/ना देय प्रमाणपत्र/११७३१/१९ दिनांक ०६/०८/२०१९ अन्वये सपोउपनि/रेयां, करुणा तुकाराम खिल्लारे तत्कालिन नेमणुक बिनतारी संदेश विभाग वाशिम यांचे दिनांक २९/१२/२०१७ ते दिनांक २७/०९/२०१८ या कालावधीतील ना देय प्रमाणपत्र पाठविण्याबाबत वेतन लिपीक-१ यांना कळविण्यात आले आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/७ वेतन आयोग/सुवेश्रे-पो.कर्म/११५४७/१९ दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक ३० जानेवारी २०१९ च्या अधिसुचनेच्या महाराष्ट्र राज्यातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागु करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ मधील नियम क्र.७ (अ) नुसार खालील नमुद पोलीस कर्मचाऱ्यांचे दिनांक ०१/०१/२०१६ रोजीपासुन सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पोलीस कर्मचारी व बिनतारी संदेश विभाग मधील कर्मचारी यांची सुधारीत वेतन निश्चिती स्तंभ अ प्रमाणे देण्यात आलेल्या वेतनाऐवजी स्तंभ ब नुसार सदरची वेतननिश्चिती वेतन मॅट्रिक्स मध्ये करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/७ वा वेतन आयोग/सुवेनि-से.नि.-पो.कर्म/११५४८/१९ दि.०२/०८/२०१९ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक ३० जानेवारी २०१९ च्या अधिसुचनेच्या महाराष्ट्र राज्यातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम सेवा (सुधारीत वेतन ) नियम २०१९ मधील नियम क्र.७ (अ.) नुसार खालील नमुद सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त/मयत/मुदतपुर्व सेवानिवृत्त तसेच बडतर्फ पोलीस कर्मचारी

ाची दि.०१/०१/२०१६ रोजीपासुन सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती स्तंभ अ प्रमाणे देण्यात आलेल्या वेतनाऐवजी स्तंभ ब नुसार वेतन निश्चिती वेतन मॅट्रीक्स मध्ये सुधारीत करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअवा/आलि-२/वेतन निश्चिती/पोना-२६/मारकंडे/११५१८/१९ दि.२९/०७/२०१९ अन्वये विनोद मारकंडे यांचे वेतननिश्चती आदेश पुढील कार्यवाही करीता वेतन लिपीक यांचे कडे देण्यात आले आहे.

**भाग -४ :- बक्षिस:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/पो.स्टे.भेट/बक्षिस/११७२९/१९ दि.०६/०८/२०१९ अन्वये आम्ही पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथे अचानक भेट दिली असता पोलीस स्टेशन मधील पोलीस अधीकारी/कर्मचारी यांचे कामाचा आढावा घेतला असता त्यामध्ये उत्कृष्ठ गणवेश परिधान दिसुन आल्याने त्यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम ३००(१) अन्वये त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात आली आहे.

१) पोहवा/६४४, केशव सरकटे नेमणुक वाशिम ग्रामीण - रु.२००/- जिएसटी.

२) पोहवा/९०१, सुभाष बोरकर नेमणुक वाशिम ग्रामीण- रुपये ५००/- जिएसटी.

**भाग -५ :- शिक्षा :- निरंक**

**निलंबन :- निरंक**

**भाग -६ :- प्रशिक्षण :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पो.अधिकारी/प्रशिक्षण/२०१९/११७०० दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक वर्कशॉप/४७१/१९ दि.२९/०७/२०१९ अन्वये Conference Room A and B, ६th floor SEBI Bhavan २] Plot C-७, G-Block Kurla Complex Bandra East Mumbai येथे आयोजीत करण्यात आली आहे. करीता वाशिम जिल्हा पोलीस घटकातुन श्री.रमेश सोनुने उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा उपविभाग जिल्हा वाशिम हयांची निवड करण्यात आली आहे. तरी त्यांनी नमुद ठिकाणी दिनांक ०७/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा.न चुकता हजर राहावे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था-४/प्रशिक्षण/सत्र क्र.२४६,२४७/महिला प्रशिक्षण/११६३९/१९ दि.०२/०८/२०१९ अन्वये न्यायसहायक विज्ञान व न्यायवैदक शास्त्र आणि तपासात अंगुलीमुद्रा चे महत्व आणि अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायदा लैंगीक शोषनातुन बालकाचे व संरक्षण अधिनियम महिला अत्याचारासंबधी दाखल गुन्हयाचा तपास या विषयावरील दिनांक ०५/०८/२०१९ ते दि.१०/०८/२०१९ पावेतोचे प्रशिक्षणाकरीता खालील प्रमाणे कर्मचारी पाठविण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| १) स्थागुशा-०१. | ४) पो.स्टे.मंगरुळपिर-०१ |
| २) जिविशा-०१ | ५) पो.स्टे.मानोरा-०१. |
| ३) संगणककक्ष-०१. | ६) पो.स्टे.वाशिम शहर.-०१. |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था-४/प्रशिक्षण/निवड पो.कर्म./०१/२०१९/११६४० दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये MIA पुणे द्वारा आयोजीत ०५ दिवसाचे INTELIGENCE COLLECTION

TECHNIQUES चे वर्कशॉप दिनांक ०५/०८/२०१९ ते दि.०९/०८/२०१९ या कालावधीत आयोजीत करण्यात आलेल्या प्रशिक्षणाकरीता जिल्हा विशेष शाखा वाशिम येथुन ०१ पोलीस कर्मचारी यांना पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पो.अधिकारी/परवानगी/२०१९/११७२६ दि.०६/०८/२०१९ अन्वये श्री रमेश सोनुने उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा यांनी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण मुंबई येथे प्रकरण क्रमांक १४/२०१० मध्ये दि. ०९/०८/२०१९ रोजी हजर राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअवा/आस्था/सेवापट-से.नि./पो.कर्म./सु.वे.श्रे./११७४२/१९ दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये दिनांक ०१/०१/२०१६ पासुन सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्त, मयत व बडतर्फ झालेले पोलीस कर्मचारी (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक ) मुळ सेवापअ सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करुन परत देण्याबाबत पेशंन लिपीक यांना कळविण्यात आले आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/निधन-फुफुटे/११७४५/२०१९ दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये सपोउपनि/८२, धनिराम श्रीराम फुफुटे नेमणुक पो.मु.वाशिम यांचे दिनांक २८/०७/२०१९ रोजी नागपुर येथील दवाखानामध्ये असतांना निधन झाले . त्यांचे दिनांक २८/०७/२०१९ रोजी निधन झाल्याने त्यांचे नाव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दिनांक २८/०७/२०१९ रोजीचे मा.नंतर पासुन कमी करण्यात आले आहे.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक ११७१८/१९ दि.०५/०८/२०१९ अन्वये पोहवा/९२३, मोबीन अहमद खान पठान यांचे मुळ सेवापट वेतन पडताळणी पथक अमरावती यांचे कडे पाठविण्यात आले आहे. सोबत पोहवा/२९३,राजेन्द्रप्रसाद यांचे मुळ सेवापट पाठविण्यात आले आहे.

याकार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-२/पो.अधी/कर्मचारी/घरभाडे भत्ता/११५६२/१९ दि.०३/०८/२०१९अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कॉलम क्रमांक ४ मधील तारखेपासुन घरभाडे भत्ता मंजुर करण्यात येत आहे.

पोहवा/५०१, मपोशि/३१७, मपोशि/१०५७.

या कार्यालयाचे शुध्दीपत्रक क्रमांक पोअवा/आशा-४/सपोउपनि-करुणा/शुध्दीपत्रक/११६६५/१९ दि.०३/०८/२०१९ अन्वये सपोउपनि/रेया श्रीमती करुणा तुकाराम खिल्लारे नेमणुक बिनतारी संदेश विभाग वाशिम यांची या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/आप्रयो/१२ वर्ष/१६३४/१९ दिनांक १८/०२/२०१९ अन्वये आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यने वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. सदर वेतन निश्चिती आदेशामध्ये त्यांचे नाव कल्पना तुकाराम खिल्लारे सपोउपनि/रेया असे दर्शविण्यात आलेले आहे. तरी त्याऐवजी करुणा तुकाराम खिल्लारे सपोउपनि/रेयां, असे वाचावे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/सेवानिवृत्ती/पो.कर्म/११५५७/१९ दि.३१/०७/२०१९ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे दिनांक ३१/०७/२०१९ रोजी सेवानिवृत्त करण्यात आले आहे. व त्यांचे नाव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन कमी करण्यात आले आहे.

पोहवा/५७ विश्वनाथ सकळकर, सपोउपनि/८८६, सुधाकर पवार.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअवा/आलि/रिपीटर प्रशिक्षणार्थी/निकाल/११५३८/१९ दि.३०/०७/२०१९ अन्वये पोलीस प्रशिक्षण केन्द्र तुरची तासगाव सांगली येथील अनुत्तीर्ण नवप्रविष्ठ प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांची दि.०१/०७/२०१९ ते दि.१०/०७/२०१९ या कालावधीत अंतीम परिक्षा घेण्यात आली होती. सदरच परिक्षेचा निकाल या कार्यालयास प्राप्त झाले असुन सदरचा निकाल खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना सदर निकालाची प्रत अदा करुन त्या बाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१) पोशि/१०७, विशाल मोहाळे.

२) पोशि/५७७, नाजिमखान कादीरखान.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/सेवानिवृत्त/पो.कर्म.-बंगाले/११५५६/१९ दि.३१/०७/२०१९ अन्वये पोहवा / विजतंत्री गणेश दत्ता बंगाले नेमणुक बिनतारी संदेश विभाग वाशिम हे दिनांक ३१/०७/२०१९ रोजी सेवानिवृत्त करण्यात आले आहे. व त्यांचे नाव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन कमी करण्यात आले आहे.

**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१ पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक ३१ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.